**ठळक बातम्या**

- शहीद दिनानिमित्त राष्ट्रपिता महात्मा गांधी यांना देशाचं अभिवादन
- यंदाचा आर्थिक सर्वेक्षण अहवाल हा देशात वेगानं होत असलेल्या सुधारणाचं प्रतिबिंब असल्याचं प्रधानमंत्र्यांचं प्रतिपादन
- केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या हस्ते आसाममधे १ हजार ७१५ कोटी रुपये खर्चाच्या विविध विकास कामांचं लोकार्पण आणि भूमीपूजन
- भारत आणि अरब देशांच्या परराष्ट्रमंत्र्यांची बैठक उद्या नवी दिल्लीत होणार

**आणि**

- छत्तीसगढच्या सुकमा जिल्ह्यात ४ माओवाद्यांचं आत्मसमर्पण

**<><><><><>**

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या ७८व्या पुण्यतिथीनिमित्त आणि शहीद दिनानिमित्त देश आदरांजली अर्पण करत आहे. यानिमित्त देशभरात विविध ठिकाणी अभिवादनाचे कार्यक्रम होत आहेत.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि उपराष्ट्रपती सी पी राधाकृष्णन यांनी नवी दिल्लीत राजघाट इथं महात्माजींच्या समाधीस्थळी जाऊन आदरांजली अर्पण केली. यावेळी सर्व धर्म प्रार्थना सभेचं आयोजनही करण्यात आलं होतं.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनीही राष्ट्रपिता महात्मा गांधी यांना आदरांजली अर्पण केली. आत्मनिर्भर भारताच्या संकल्पनेचा मुख्य आधार असलेल्या स्वदेशीच्या विचारावर गांधीजींनी नेहमीच भर दिल्याचं प्रधानमंत्र्यांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे. गांधीजींचं व्यक्तिमत्त्व आणि त्यांचं कार्य देशवासीयांना सदैव कर्तव्याच्या मार्गावर चालण्याची प्रेरणा देत राहील, असंही ते म्हणाले.

भाषा, धर्म, जात या आधारावर विभागलेल्या भारताला बापूजींनी एका सूत्रात बांधलं, असं केंद्रीय गृह मंत्री अमित शहा यांनी आपल्या समाज माध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे. लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी आणि काँग्रेस नेत्या प्रियांका गांधी यांनी

राजघाटावर जाऊन महात्मा गांधी यांना आदरांजली वाहिली. राज्यसभेतले विरोधी पक्ष नेते मल्लिकार्जुन खरगे यांनीही महात्मा गांधींना आदरांजली वाहिली आहे.

नवी दिल्लीत सर्वोच्च न्यायालयात सकाळी १० वाजून ५८ मिनिटांनी दोन मिनिटं शांतता पाळून राष्ट्रपिता महात्मा गांधी यांना श्रद्धांजली वाहण्यात आली.

महाराष्ट्राचे राज्यपाल आचार्य देवव्रत, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही राष्ट्रपित्याला अभिवादन केलं. मुंबईत विधानभवन इथल्या गांधीजींच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करुन आदरांजली वाहण्यात आली.

**<><><><><>**

यंदाचा आर्थिक सर्वेक्षण अहवाल हा देशात वेगानं होत असलेल्या सुधारणाचं प्रतिबिंब आहे, असं मत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केलं आहे. हा अहवाल, आव्हानात्मक जागतिक परिस्थितीतही भारताच्या सातत्यपूर्ण प्रगतीचं प्रतिबिंब असून, राष्ट्रनिर्माणातील नवोपक्रम, उद्योजकता आणि  पायाभूत सुविधांची वाढती भूमिका यावर प्रकाश टाकत आहे, असंही त्यांनी म्हटलं आहे.

**<><><><><>**

आसाममध्ये दिब्रुगढ इथे विधानसभेच्या दुसऱ्या इमारतीसह १ हजार ७१५ कोटी रुपये खर्चाच्या विविध प्रकल्पांची पायाभरणी आणि उद्घाटन आज केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या हस्ते झालं. आसामचे मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा, केंद्रीय मंत्री सर्बानंद सोनोवाल आणि इतर मान्यवर यावेळी उपस्थित होते. या प्रकल्पांमध्ये तीन मजल्यांची विधानसभेची इमारत, आमदारांसाठीचं वसतिगृह, ८०० आसनक्षमतेचं सभागृह आणि सुरक्षा कर्मचाऱ्यांसाठीच्या खोल्यांचा समावेश आहे. त्याखेरीज आधुनिक क्रीडा संकुलाच्या पहिल्या टप्प्याचं उद्घाटन आणि दुसऱ्या टप्प्याची पायाभरणीही शहा यांच्या हस्ते करण्यात आली. वन्य प्राण्यांच्या उपचारांसाठी २९२ कोटी रुपये खर्चच्या वन्यजीव आरोग्य आणि संशोधन केंद्राची पायाभरणीही आज शहा यांच्या हस्ते झाली. राष्ट्रीय आपत्ती निवारण निधी अंतर्गत पाणथळ जागांच्या पुनर्संचयन आणि पुनरुज्जीवनासाठी ६९२ कोटी रुपयांच्या प्रकल्पाचं उद्घाटनही शहा यांनी केलं.

**<><><><><>**

कृत्रिम बुद्धिमत्तेच्या नैतिक वापराबाबत कोणतीही तडजोड केली जाऊ नये, तसंच पारदर्शक, निष्पक्ष आणि सुरक्षित असलेल्या कृत्रिम बुद्धिमत्ता परिसंस्थेच्या दिशेनं काम करण्याची गरज आहे, असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रात काम करणाऱ्या आघाडीच्या कंपन्या आणि संस्थांच्या मुख्य कार्यकारी अधिकारी आणि तज्ज्ञांशी मोदी यांनी काल आपल्या निवासस्थानी संवाद साधला. यावेळी केंद्रीय इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव आणि राज्यमंत्री जितीन प्रसाद उपस्थित होते.

**<><><><><>**

संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा परिषदेतल्या स्थायी सदस्यांच्या यादीत आशियाला प्रतिनिधित्व कमी असून त्यात सुधारणा आवश्यक असल्याचं प्रतिपादन संयुक्त राष्ट्रांचे प्रमुख अँटोनियो गुटेरस यांनी केलं आहे. ते आज पत्रकारांशी बोलत होते. आशियाई देशांच्या प्रतिनिधित्वात वाढ करण्याच्या दृष्टीने भारताने सुधारणांचा प्रस्ताव ठेवला असून या प्रस्तावाला सदस्यांनी पाठिंबा दिल्याचंही गुटेरस यावेळी म्हणाले. भारत आणि युरोपियन महासंघात अलीकडेच झालेल्या मुक्त व्यापार कराराचा उल्लेख करून, ते म्हणाले की जागतिक आव्हानांचा सामना करण्यासाठी बहुध्रुवीकरण आवश्यक आहे.

**<><><><><>**

भारत आणि अरब देशांच्या परराष्ट्रमंत्र्यांची बैठक उद्या नवी दिल्लीत होणार आहे. बैठकीचं अध्यक्षपद भारत आणि संयुक्त अरब अमिरातींकडे आहे. भारतात ही बैठक प्रथमच होत आहे. यापूर्वी अशी  बैठक २०१६मधे बहारिन इथं झाली होती. अर्थव्यवस्था, उर्जा, शिक्षण, प्रसारमाध्यम आणि सांस्कृतिक क्षेत्रात सहकार्याला प्राधान्य देण्याचा निर्णय या बैठकीत झाला होता. उद्याच्या बैठकीची पूर्वतयारी म्हणून सर्व देशांच्या परराष्ट्र खात्यांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची बैठक आज होत आहे. कतार, लिबिया, सोमालिया, कॉमोरोस, पॅलेस्टीन, सुदान हे देश तसंच अरब देश संघटनेचे महासचिव बैठकीत सहभागी होत आहेत.

परराष्ट्रव्यवहार मंत्री डॉ. एस जयशंकर यांनी आज अरब देश संघटनेचे महासचिव अहमद अब्दुल घेईट यांचच्याशी चर्चा केली. उभयपक्षी हिताच्या अनेक मुद्द्यांवर यावेळी चर्चा झाली.

**<><><><><>**

छत्तीसगढच्या सुकमा जिल्ह्यात आज ४ माओवाद्यांनी शरणागती पत्करली. त्यात दोन महिलांचा समावेश असून त्या चौघांवर मिळून ८ लाख रुपयांचं बक्षीस होतं. बस्तरचे पोलीस महानिरिक्षक सुंदरराज पी आणि सुकमाचे पोलीस अधीक्षक किरण चव्हाण यांच्यासमोर या चौघांनी शस्त्रं टाकली. त्यांच्याकडून ४ शस्त्रं जप्त केली आहेत. हे चौघे गोलापल्ली, कोंटा आणि किस्ताराम परिसरात सक्रीय होते.

बीजापूर जिल्ह्यात काल सुरक्षादलांबरोबरच्या चकमकीत २ माओवादी ठार झाले. त्यांच्याकडून शस्त्रास्त्र आणि दारुगोळा हस्तगत करण्यात आला.

<><><><>

रणजी करंडक कसोटी क्रिकेट स्पर्धेत कालपासून मुंबई विरुद्ध दिल्ली असा सामना सुरू झाला आहे. मुंबईत वांद्रे कुर्ला संकुलातल्या शरद पवार मैदानावर सुरू असलेल्या या सामन्यात काल दिल्ली संघाने २२१ धावा केल्या होत्या. या धावांचा पाठलाग करताना मुंबईने काल दिवसअखेर १ बाद १३ धावा केल्या होत्या.

आज उपाहारापर्यंत मुंबई संघाच्या ३ गडी बाद ८८ धावा झाल्या होत्या.

<><><><>

यूक्रेनमधे सध्या कडक्याच्या थंडीमुळे कीव आणि इतर यूक्रेनीयन शहरांवरील हल्ले एका आठवड्यासाठी तात्पुरते थांबवण्यास रशियाचे अध्यक्ष व्लादीमीर पुतीन यांनी सहमति दर्शवली असल्याचं अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी काल मंत्रिमंडळ बैठकीत बोलताना सांगितलं. रशियन नेतृत्वाशी वैयक्तिक संवाद साधून हल्ले थांबवण्याची आपण विनंती केली असल्याचं ट्रम्प म्हणाले.

<><><><>

देशाच्या उत्तर भागात थंडीचा जोर अद्याप कायम आहे. जम्मूकाश्मीरमधे आज जम्मू श्रीनगर महामार्गावरची वाहतूक आज सुरळीत झाली मात्र अनेक ठिकाणी बर्फामुळे रस्ते निसरडे झाले असून वाहनचालकांनी सावधगिरी बाळगावी असं प्रशासनाने कळवलं आहे.

हिमाचल प्रदेशात पश्चिमेच्या वाऱ्यांमुळे पुन्हा एकदा पाऊस आणि हिमवृष्टीची शक्यता आहे. किमान तापमान उणे १० अंश सेल्सियस पर्यंत घसरलं आहे.

राजस्थानात दाट धुक्यामुळे दृष्यमानता कमी झाली असून त्याचा रस्ते वाहतुकीवर परिणाम होत आहे. भीलवाडा - उदयपूर रस्त्यावर ६ वाहनं एकमेकावर आदळून झालेल्या

अपघातात ३ जणांचा मृत्यू झाला. मध्यप्रदेश आणि छत्तीसगढमधेही थंडीचा कडाका असून दाट धुकं पसरलं आहे.

देशाच्या उत्तरेकडील राज्यांत, विशेषकरून दिल्ली, पंजाब, हरयाणा, चंदीगढ आणि उत्तर प्रदेशांत दाट धुके आणि थंडीची लाट राहण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. हिमालयाच्या डोंगराळ प्रदेशात हिमवृष्टीची शक्यता आहे.

**<><><><><>**

२०२६-२७ या आर्थिक वर्षाचा केंद्रीय अर्थसंकल्प येत्या रविवारी, १ फेब्रुवारी रोजी सादर होणार आहे. अर्थमंत्री निर्मला सीतारामन सलग नवव्यांदा केंद्रीय अर्थसंकल्प सादर करतील. दरम्यान अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या कालच्या दुसऱ्या दिवशी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संसद भवन परिसरात वार्ताहरांशी संवाद साधला. देशाची वाटचाल आता प्रलंबित समस्यांच्या पलिकडे जात दीर्घकालीन उपाययोजनांच्या मार्गावर होत असल्याचं पंतप्रधान यावेळी म्हणाले.

**//<><><><><>//**